पुण्य नगरी
smart Chandrapur
बुधवार, २३ जानेवारी २०१९

# चंद्रपुरात राज्यस्तरीय लोकनृत्य स्पर्धा



## राज्यभरातून आलेले १८ संघ सहभागी

**चंद्रपूर** : स्थानिक प्रियदर्शिनी इंदिरा गांधी सांस्कृतिक सभागृहात १९ जानेवारी रोजी महाराष्ट्र कामगार मंडळाची राज्यस्तरीय लोकनृत्य स्पर्धा पार पडली. या स्पर्धेत महाराष्ट्रातील १८ संघांनी सहभाग घेतला होता. यात प्रथम क्रमांक गट कार्यालय चंदननगर नागपूर धारिया लोकनृत्य, द्वितीय क्रमांक गट कार्यालय अंधेरी मुंबई होजागिरी नृत्य, तृतीय क्रमांक गट कार्यालय विक्रोळी मुंबई रनप्पा नृत्य तसेच उत्तेजनार्थ गट कार्यालय लातूर व गट कार्यालय जळगाव हे संघ पुरस्काराचे मानकरी ठरले.

सदर राज्यस्तरीय लोकनृत्य स्पर्धेचा पारितोषीक वितरण कार्यक्रमाप्रसंगी ना. सुधीर मुनगंटीवार यांनी चित्रफितीद्वारे सर्व स्पर्धकांना शुभसंदेश दिला. याप्रसंगी महापौर अंजली घोटेकर, ज्येष्ठ नाट्यकर्मी अजय धवने, स्पॅक्ट्रम संस्थेचे संचालक सुनील पाटील, मंडळाचे कल्याण आयुक्त सतीश दाभाडे, साहाय्यक कल्याण आयुक्त घनश्याम कुळमेथे, नंदलाल राठोड, श्रीकांत धोत्रे, अरुण कापसे उपस्थित होते. स्पर्धेचे परीक्षक म्हणून जावेद, प्रशांत कत्तुलवार, यशश्री फटींगे यांनी काम पाहिले. विजेत्या संघांना रोख स्वरुपात मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन कामगार कल्याण अधिकारी प्रतिभा भाकरे यांनी केले. तर आभार मंडळाचे साहाय्यक कल्याण आयुक्त घनश्याम कुळमेथे यांनी मानले. यशस्वीतेसाठी कामगार कल्याण अधिकारी वैशाली नवघरे, कांचन वाणी, सत्यजित चौधरी यांनी सहकार्य केले.

लोकमत

# राज्यस्तरीय लोकनृत्य स्पर्धा; नागपूर संघ अजिंक्य



लोकनृत्य स्पर्धेत प्रथम पारितोषिक पटकविलेला चंदननगर नागपूर येथील संघ

लोकमत न्यूज नेटवर्क

चंद्रपूर : स्थानिक प्रियदर्शिनी इंदिरा गांधी सांस्कृतिक सभागृहात महाराष्ट्र कामगार मंडळातर्फे राज्यस्तरीय लोकनृत्य स्पर्धा नुकतीच पार पडली. सदर स्पर्धेत महाराष्ट्रातील एकूण १८ संघानी सहभाग घेऊन एकापेक्षा एक सरस असे लोकनृत्य सादर केले.

लोकनृत्य स्पर्धेत प्रथम क्रमांक गट कार्यालय चंदननगर, नागपूर यांच्या धारीया नृत्याला, द्वितीय गट कार्यालय अंधेरी, मुंबई यांच्या होजागीरी नृत्याला, तृतीय गट कार्यालय विक्रोळी मुंबई यांच्या रणप्पा नृत्याला तर उत्तेजनार्थ गट कार्यालय लातूर व गट कार्यालय जळगाव हे संघाला घोषित करण्यात आलगे.

राज्यस्तरीय लोकनृत्य स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभाप्रसंगी अर्थ, वन व वित्तमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी चित्रफीतीद्वारे सर्व स्पर्धकांना शुभ संदेश देत मार्गदर्शन केले. यावेळी महापौर अंजली घोटेकर, ज्येष्ठ नाट्यकर्मी अजय धवने, स्पक्ट्रम संस्थेचे संचालक सुनील पाटील, मंडळाचे कल्याण आयुक्त सतीश दाभाडे, सहाय्यक कल्याण आयुक्त घनश्याम कुळमेथे, नंदलाल राठोड, श्रीकांत धोत्रे, अरुण कापसे आदी उपस्थित होते. स्पर्धेचे परीक्षण प्रशांत कत्तुलवार, यशश्री फटिंगे यांनी केले. विजेत्या संघाला रोख स्वरुपात पारितोषिक देण्यात आले.

कार्यक्रमाचे संचालन कामगार कल्याण अधिकारी प्रतिभा भाकरे तर आभार मंडळाचे सहाय्यक कल्याण आयुक्त घनश्याम कुळमेथे यांनी केले. यावेळी कामगार कल्याण अधिकारी वैशाली नवघरे, कांचण वाणी, सत्यजीत चौधरी उपस्थित होते. कार्यक्रमासाठी गट कार्यालय चंद्रपूर, विभागीय कार्यालय नागपूर व गट कार्यालय अकोला येथील कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

सकाळ

# महाराष्ट्र कामगार मंडळाची राज्यस्तरीय लोकनृत्य स्पर्धा

## नागपूरचे धारिया लोकनृत्य प्रथम; मुंबईचे होजागिरी द्वितीय

**चंद्रपूर, ता. २२ :** स्थानिक प्रियदर्शिनी इंदिरा गांधी सांस्कृतिक सभागृहात १९ जानेवारीला महाराष्ट्र कामगार मंडळाची राज्यस्तरीय लोकनृत्य स्पर्धा पार पडली. स्पर्धेत महाराष्ट्रातील एकूण १८ संघांनी सहभाग घेतला. स्पर्धेत प्रथम क्रमांक गट कार्यालय चंदननगर नागपूरचे धारिया लोकनृत्याने पटकाविला.

यावेळी द्वितीय क्रमांक गट कार्यालय अंधेरी मुंबई होजागिरी नृत्य, तृतीय क्रमांक गट कार्यालय विक्रोळी मुंबई रनप्पा नृत्य तसेच उत्तेजनार्थ गट कार्यालय लातूर व गट कार्यालय जळगाव हे संघ पुरस्काराचे मानकरी ठरले. राज्यस्तरीय लोकनृत्य स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभाप्रसंगी वित्त, नियोजन व वन तथा पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी चित्रफितीद्वारे सर्व स्पर्धकांना शुभेच्छा संदेश दिला. याप्रसंगी चंद्रपूर शहराच्या महापौर अंजली घोटेकर, ज्येष्ठ नाट्यकर्मी अजय धवने, स्पॅक्टम संस्थेचे संचालक सुनील पाटील तसेच मंडळाचे कल्याण आयुक्त सतीश दाभाडे, सहायक कल्याण आयुक्त घनश्याम कुळमेथे, नंदलाल राठोड, श्रीकांत धोत्रे, अरुण कापसे इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

या स्पर्धेचे परीक्षक जावेद सर, प्रशांत कत्तुलवार, यशश्री फटिंगे यांनी केले. महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या राज्यस्तरीय लोकनृत्य स्पर्धेला चंद्रपूरवासींनी भरभरून प्रतिसाद दिला. राज्यातून आलेल्या लोकनृत्य संघांनी एकापेक्षा एक अशी कला सादर केल्या. विजेत्या संघांनी रोख स्वरूपात मान्यवरांच्या हस्ते बक्षिसे वितरण करण्यात आली. लोकनृत्य स्पर्धा संचालन कामगार कल्याण अधिकारी प्रतिभा भाकरे यांनी तर आभार मंडळाचे सहायक कल्याण आयुक्त घनश्याम कुळमेथे यांनी केले. कार्यक्रमाकरिता कामगार कल्याण अधिकारी वैशाली नवघरे, कांचन वाणी, सत्यजित चौधरी यांनी सहकार्य केले. कार्यक्रमासाठी गट कार्यालय चंद्रपूर, विभागीय नागपूर व गट कार्यालय अकोला येथील कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.



**चंद्रपूर : विजेत्या चमूसह घोटेकर, धवने, पाटील, दाभाडे, कुळमेथे, राठोड.**

Nagpur, Chandrapur-Today
23/01/2019 Page No. 4

वैचारिक क्रांतीचा अग्रदूत
देशोन्नती
नागपूर बुधवार, दि.२३ जानेवारी २०१९ पृष्ठे ८+८ मूल्य ₹:६

चंद्रपूर Live

# कामगार व कामगार कुटूंबियाकरीता स्पर्धा परिक्षा पुर्वतयारी प्रशिक्षण योजनेचे उद्घाटन



*प्रतिनिधी / २२ जानेवारी*

**चंद्रपूर :** स्थानिक प्रियदर्शनी इंद्रिरा गांधी सांस्कृतिक सभागृहात महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळातर्फे दि. १९ जानेवारी २०१९ रोजी सायंकाळी ६.०० वाजता मंडळाचे कल्याण आयुक्त सतिश दाभाडे यांच्या हस्ते कामगार व कामगार कुटूंबियाकरिता स्पर्धा परिक्षा पुर्व तयारी प्रशिक्षण योजनेचे उदघाटन करण्यात आले.

सदर कार्यक्रमाप्रसंगी चद्रपूर शहराच्या महापौर अंजली घोटेकर जेष्ठ नाटयकर्मी अजय धने, स्पॅक्ट्रस संस्थेचे संचालक सुनिल पाटील तसेच मंडळाचे महा कल्याण आयुक्त धनशाम कुळमेथे नंदलाल राठोड, श्रीकांत धोत्रे अरूण कापसे इ. मान्यवरांच्या उपस्थितीत उदघाटन सोहळा संपन्न झाला.

कामगार व कामगार कुटूंबियाकरीता स्पर्धा परिक्षा पुर्वतयारी प्रशिक्षण योजनेचे उदघाटन सतिश दाभाडे कल्याण आयुक्त मुंबई यांनी केले. सदर कार्यक्रमाचे संचालन कामगार कल्याण अधिकारी प्रतिमा भाकरे तर आभार प्रदर्शन सहा कल्याण आयुक्त घनश्याम कुळमेथे यांनी केले.

कार्यक्रम यशस्वी करीता कामगार कल्याण अधिकारी वैशाली नवघरे, कांचन वाणी तसेच विभागीय कार्यालय, नागपूर गट कार्यालय चंद्रपूर व अकोला येथील कर्मचारी वर्ग यांनी अथक परिश्रम घेतले.

नवभारत




# राज्यस्तरीय लोकनृत्य स्पर्धा के पुरस्कार वितरित

**चंद्रपुर (का).** कामगार मंडल की राज्यस्तरीय लोकनृत्य स्पर्धा प्रियदर्शनी इंदिरा गांधी सांस्कृतिक सभागृह में ली गई. स्पर्धा में महाराष्ट्र के 18 समूह शामिल हुए थे. प्रथम क्रमांक पर नागपुर के चंदन नगर के धारिया लोकनृत्य व द्वितीय क्रमांक मुंबई अंधेरी का होजागिरी नृत्य, तृतीय क्रमांक मुंबई विक्रोली रनप्पा ने प्राप्त किया. लोकनृत्य स्पर्धा पुरस्कार वितरण समारोह में वित्तमंत्री सुधीर मुनगंटीवार, महापौर अंजलि घोटेकर, अजय धवने, सुनील पाटिल, सतीश दाभाडे, घनश्याम कुलमेथे, नंदलाल राठोड, श्रीकांत धोत्रे, अरुण कापसे आदि उपस्थित थे. परीक्षक के रूप में जावेद, प्रशांत कत्तुलवार, यशश्री फटिंग थे. महाराष्ट्र कामगार कल्याण मंडल के राज्यस्तरीय लोकनृत्य स्पर्धा को महानगरवासियों ने अच्छा प्रतिसाद दिया. संचालन कामगार कल्याण अधिकारी प्रतिभा भाकरे ने व आभार सहायक कल्याण आयुक्त घनश्याम कुलमेथे ने माना. कार्यक्रम में वैशाली नवघरे, कांचन वाणी, सत्यजीत चोधरी ने सहयोग दिया. सफलतार्थ कर्मचारीयों ने प्रयास किए.

Navabharat Chandrapur Plus Edition
23 Jan, 2019 Page No. 2

वैचारिक क्रांतीचा अग्रदूत
# देशोन्नती
नागपूर शनिवार, दि.१९ जानेवारी २०१९ पृष्ठे ८+८ मूल्य ₹:६

# राज्यस्तरीय लोकनृत्य स्पर्धेत आज तरूणाई थिरकणार, राज्यातील ३०० नृत्य कलावंतांची मांदियाळी

*प्रतिनिधी / १८ जानेवारी*

**चंद्रपूर :** आज चंद्रपूर प्रथमच राज्यस्तरीय लोकनृत्य स्पर्धा प्रियदर्शनी इंदिरा गांधी सांस्कृतीक सभागृहात १९ जानेवारी रोजी सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजे. पर्यंत होणार आहे. या स्पर्धेसाठी राज्यातून नामवंत असे १८ कलावंताचे संघ आपला नृत्य कलाविष्कार सादर करणार आहे या लोकनृत्यू कलेची जोपासना करणारी तरूणाई रंगमचावर थिरकणार आहे.

या स्पर्धेकरीता राज्यातील ३०० कलावतांची मांदियाळी चंद्रपूर नगरीत आली आहे. या बलशाली महाराष्ट्र राज्यात मानाचे स्थान असलेल्या सांस्कृतिक लोकनृत्य कलेची जोपासना अनेक वर्षापासून अविरतपणे महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाकडून केल्या जात आहे या लोकनृत्य कलेचा ठेवा जतन व्हावा त्या करीता मंडळा करवी राज्याच्या विविध भागात दरवर्षी या राज्यस्तरीय लोकनृत्य स्पर्धेचे आयोजन केले जाते या स्पर्धेत विजयी ठरणाऱ्या संघाना अनुक्रमे पुरस्कार देऊन गौरविण्यात येते मंडळाचा हा कल्पक उपक्रम संपूर्ण राज्यातील लोककला जोपासणाऱ्या कलावंताकरीता एक संजीवनी देणारा ठरत आहे.

या उपक्रमला समाज मान्यतेची मोहर लागली आहे. त्यामुळे या उपक्रमाच्या त्रिज्या दिवसेन दिवस वृध्दीगंत होत आहेत. या राज्यस्तरीय लोकनृत्य स्पर्धेला १९ जानेवारी सकाळी १० वाजता प्रारंभ होणार आहे तर या स्पर्धेचे पारितोषीक वितरण आणि स्पर्धा परिक्षा पुर्वतयारी प्रशिक्षण योजनेचा शुभारंभ सायंकाळी ६ वाजता स्थानिक प्रियदर्शनी इंदिरा गांधी सांस्कृतिक सभागृहात मान्यवरांच्या उपस्थिती मध्ये होणार आहे.

सदर कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून वित्त नियोजन व वने कॅबिनेट मंत्री सुधीन मुनगंटीवार उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी केंद्रिय गृहराज्य मंत्री ना. हंसराज अहिर विशेष उपस्थिती वन विकास महामंडळ अध्यक्ष चंदनसिंह चंदेल, महापौर अंजली घोटेकर, आमदार नाना शामकुळे, जिल्हाधिकारी कुणाल खेमनार तसेच महाराष्ट्र राज्याचे कामगार कल्याण आयुक्त सतिश दाभाडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थितीत राहणार आहेत. या स्पर्धनिमित्य राज्यातून आलेल्या लोकनृत्य कलावंत उपासकांच्या कलेला प्रोत्साहन देण्यासाठी शहरवासी मोठ्या संख्येने उपस्थितीत रहावे असे आवाहन कार्यक्रम व्यवस्थापन समिती प्रमुख श्रीकांत धोबे, अरूण कापसे, राजेश पाठराबे यांनी केले आहे.

तरुण भारत

■ नागपूर । शनिवार, १९ जानेवारी २०१९ । युगाब्द-५१२० । मूल्य ५ रुपये । www.tarunbharat.net

पृष्ठ

# राज्यस्तरीय लोकनृत्य स्पर्धा आज शहरात

## ३०० नृत्य कलावंतांची मांदियाळी

◆ चंद्रपूर, १८ जानेवारी

चंद्रपूरनगरीत प्रथमच राज्यस्तरीय लोकनृत्य स्पर्धा स्थानिक प्रियदर्शनी इंदिरा गांधी सांस्कृतिक सभागृहात शनिवार, १९ जानेवारी रोजी सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत होणार आहे. या स्पर्धेसाठी राज्यातून नामवंत १८ कलावंतांचे संघ नृत्याविष्कार सादर करणार आहेत. या लोकनृत्य कलेची जोपासना करणारी तरुणाई रंगमंचावर थिरकणार आहे. स्पर्धेसाठी राज्यातील ३०० कलावंतांची मांदियाळी चंद्रपूरनगरीत पोहोचली आहे.

महाराष्ट्र राज्यात मानाचे स्थान असलेल्या सांस्कृतिक लोकनृत्य कलेची जोपासना अनेक वर्षांपासून अविरतपणे महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाकडून केल्या जात आहे. या लोकनृत्य कलेचा ठेवा जतन व्हावा, याकरिता मंडळाकडून राज्याच्या विविध भागात दरवर्षी या राज्यस्तरीय लोकनृत्य स्पर्धेचे आयोजन केले जाते.

या स्पर्धेत विजयी ठरणाऱ्या संघांना पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. या राज्यस्तरीय लोकनृत्य स्पर्धेला शनिवारी सकाळी ११ वाजता प्रारंभ होणार असून, या स्पर्धेचे पारितोषिक वितरण आणि स्पर्धा परीक्षा पूर्वतयारी प्रशिक्षण योजनेचा शुभारंभ सायंकाळी ६ वाजता स्थानिक प्रियदर्शिनी इंदिरा गांधी सांस्कृतिक सभागृहात मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे.

कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून राज्याचे अर्थमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार, तर अध्यक्षस्थानी केंद्रीय गृहराज्यमंत्री हंसराज अहिर यांची उपस्थिती राहील. विशेष उपस्थितांमध्ये वनविकास महामंडळाचे अध्यक्ष चंदनसिंह चंदेल, महापौर [illegible]ी घोटेकर, आमदार नाना श्यामकुळे, जिल्हाधिकारी डॉ. कुणाल खेमनार, राज्याचे कामगार कल्याण आयुक्त सतिश दाभाडे यांची उपस्थिती राहणार आहे.

स्पर्धेतील कलावंतांना प्रोत्साहन देण्यासाठी चंद्रपूरवासीयांनी उपस्थित राहावे, असे आवाहन व्यवस्थापन समिती प्रमुख श्रीकांत धोत्रे, असग, कापसे, राजेश पाठराबे यांनी केले आहे. ◆(तभा वृत्तसेवा)